# पुणे महानगरपालिका

## * स्थायी समिती *

## <u>कार्यपत्रिका क्रमांक ३७</u>

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. १५/१२/२०२०** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे दृक श्राव्य (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) द्वारे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

### घनकचरा व्यवस्थापन आढावा

**विषय क्र. ७९२**

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाविषयी पंधरा क्षेत्रिय कार्यालयाकडील दि.१/११/२०२० ते दि.३०/११/२०२० अखेर पर्यंत पाठविलेला अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) यांचे जा.क्र.घकव्यका/३२५३ दि. ३/१२/२०२० चे पत्र.

### उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा

**विषय क्र. ७९३**

पुणे महानगरपालिका क्षेत्रिय आयुक्त, परिमंडळ क्र. २ कार्यालय अधिनिस्त औंध–बाणेर, शिवाजीनगर–घोलेरोड व कोथरुड–बावधन या क्षेत्रिय कार्यालयांच्या माहे नोव्हेंबर २०२० च्या कामकाजाचा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पक्र.२/४७७ दि.९/१२/२०२० चे पत्र.

### मा.सभासदांचे प्रस्ताव

**विषय क्र. ७९४**

मा.सौ.मनिषा लडकत, मा.सौ.अश्विनी भागवत, मा.महेश वाबळे, मा.सौ.राजश्री शिळीमकर, मा.प्रिया गदादे व मा.सौ.मनिषा कदम यांचे दि.७/१२/२०२० चे पत्र.

पुणे महानगरपालिकेने मिळकत करावरील दंडातील रकमेत ८०%सूट देणेची अभय योजना राबविली असून त्यायोजनेचा नागरिकांनी खूप मोठ्या प्रमाणावर लाभ घेतलेला आहे. या योजनेस चांगला प्रतिसाद मिळत आहे. परंतु त्याची मुदत ३१ नोव्हेंबर २०२० रोजी संपलेली असल्याने अनेक नागरिकांना त्याचा फायदा घेता आला नाही. यावर्षी कोरोना वाढता संसर्ग लॉकडाऊनची पार्श्वभूमी यामुळे अनेक नागरिकांचे उत्पन्न ठप्प झाल्याचे दिसून येत आहे.तरी देखील अनेक नागरिकांनी या योजनेचा फायदा घेवून महानगरपालिकेच्या उत्पन्नात अंदाजे रु.३५० कोटी मिळकत करापोटी भरलेले आहेत. या योजनेला मुदतवाढ दिल्यास आणखी नागरिक त्याचा फायदा घेवून मिळकत कर भरण्यास तयार होतील.

तरी पुणे महानगरपालिकेच्या मिळकत कराची अभय योजनेचा कालावधी एक महिना वाढवून ३१ डिसेंबर २०२० पर्यत करण्यात यावा,त्यामुळे पुणे महानगरपालिकेच्या महसूलात वाढ होण्यास मदत होईल.

### माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. ७९५**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. १/८/२०२० अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि.१/८/२०२० अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/१४९५ दि. ७/१२/२०२० ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये २९,०३,७१४/– चा तक्ता माहितीसाठी.

**विषय क्र. ७९६**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. ८/८/२०२० अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि.८/८/२०२० अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/१४९६ दि. ७/१२/२०२० ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये १६,७०,८१२/– चा तक्ता माहितीसाठी.

**विषय क्र. ७९७**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. १५/८/२०२० अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि.१५/८/२०२० अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/१४९७ दि. ७/१२/२०२० ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये ३,५०,५४०/– चा तक्ता माहितीसाठी.

**विषय क्र. ७९८**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. २२/८/२०२० अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि.२२/८/२०२० अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/१४९८ दि. ७/१२/२०२० ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये २१,०३,३८७/– चा तक्ता माहितीसाठी.

**विषय क्र. ७९९**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. २९/८/२०२० अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि.२९/८/२०२० अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/१५०० दि. ७/१२/२०२० ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये १०,५८,९१५/– चा तक्ता माहितीसाठी.

**विषय क्र. ८००**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ यांच्या अखत्यारीतील माहे १६ ते ३० सप्टेंबर २०२० ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/प.क्र.५/४७२ दि.८/१२/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ८०१**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ यांच्या अखत्यारीतील माहे १ ते १५ ऑक्टोंबर २०२० ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/प.क्र.५/४७३ दि.८/१२/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ८०२**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ यांच्या अखत्यारीतील माहे १६ ते ३१ ऑक्टोंबर २०२० ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/प.क्र.५/४७४ दि.८/१२/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ८०३**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ यांच्या अखत्यारीतील माहे १ ते १५ नोव्हेंबर २०२० ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/प.क्र.५/४७५ दि.८/१२/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ८०४**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ यांच्या अखत्यारीतील माहे १ ते १५ सप्टेंबर २०२० ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/प.क्र.५/४७६ दि.९/१२/२०२० चे पत्र.

## सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स

**विषय क्र. ८०५**

बिबवेवाडी मुख्य रस्त्यावरील पुष्पमंगल चौक ते महेश सोसायटी (उजवी बाजु) एच.टी. व एल.टी. लाईन भुमिगत करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १२ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.लाड ॲण्ड असोशिएटस् यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रु.२,७४,०१,२४५/- पेक्षा ९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२,४९,३५,१३३/- अधिक जी.एस.टी. १२% र.रुपये २९,९२,२१६/- असे एकूण र.रुपये २,७९,२७,३४९/- जीएसटीसह अथवा उपलब्ध रक्कमेपर्यंत काम करुन घेणेस व त्यांच्याशी करारनामा करणेस आणि त्यांनी केलेल्या कामापोटी बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ई) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/४६५ दि.८/१२/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ८०६**

कोविड-१९ च्या अनुषंगाने आपत्कालिन परिस्थितीसाठी पुणे महानगरपालिकेच्या दवाखाने, रुग्णालये व विलगीकरण कक्ष येथे अत्यावश्यक विद्युत विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.जे.व्ही.एस. इंजिनिअरिंग यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रु.३४,४७,८८६/- पेक्षा १०.९१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३०,७१,७२१=६४ अधिक जी.एस.टी. १२% र.रुपये ३,६८,६०६=६० असे एकूण र.रुपये ३४,४०,३२८=२३ पर्यंत काम करुन घेणेस व त्यांच्याशी करारनामा करणेस आणि त्यांनी केलेल्या कामापोटी बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ई) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/४६६ दि.८/१२/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ८०७**

भाडेतत्वावर टुरिस्ट परवाना असलेली जीप संवर्गातील वाहने पुरविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. स्वंयभू ट्रान्सपोर्ट, पुणे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.१,००,००,०००/- पेक्षा ७% जादा) असल्याने त्यांचेकडून आवश्यकतेनुसार घेणेस व त्याकामी त्यांचेबरोबर करारनामा करणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ई) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/४६७ दि.८/१२/२०२० चे पत्र.

१) भाडेतत्वावर टुरिस्ट परवाना असलेली जीप संवर्गातील वाहने मे. स्वंयभू ट्रान्सपोर्ट, पुणे यांचेकडून त्यांचे टेंडर दराने (७% ने जादा) एकूण रुपये १,०७,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी सात लाख फक्त) पर्यंत आवश्यकतेनुसार घेणेस व त्यापोटी त्यांचेबरोबर करारनामा करणेस ---

२) प्रकरणी कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भाव रोखण्यासाठी करावयाचे कामकाजाअंतर्गत मनपाचे विविध दवाखाने, क्षेत्रिय कार्यालये डॉक्टर, नर्स वैंद्यकीय कामकाज करणारे कर्मचारी, क्वारंटाईन सेंटर, कोरोना विषयक जनजागृती करणे या कामासाठी तसेच मनपाच्या अत्यावश्यक कामी पुरविण्यात येणारी वाहने अपुरी असल्याने भाडेतत्वावर वाहने घ्यावयाची सेवा बंद केल्यास मनपाचे कोविड-१९ विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी करावयाचे कामकाज व मोटार वाहन विभागाकडील कामकाजामध्ये अडथळे येण्याची शक्यता असल्याने निविदाचे ब पाकीट उघडल्याचे दिनांकापासून म्हणजेच दि. २२/०७/२०२० पासून या निविदामधून भाडेतत्वावर घेण्यात येत असलेल्या वाहनांचे कामास मान्यता मिळणेस---

**मागील सभेचे विषय**

**विषय क्र. ८०८**

मा.सौ.मुक्ता टिळक, आमदार व मा.दिपक पोटे यांचे दि. २९/६/२०२० चे पत्र.

पुणे शहरात कोविड-१९ विषाणू संसर्ग रोखणेकामी उपाययोजना व उपचार करणेकरीता विविध साधनसामुग्री खरेदी करणेसाठी र.रुपये १ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२०-२०२१ चे अंदाजपत्रक,हेरिटेज अंतर्गत विविध कामे करणे, पान क्र. २७४, यादी क्र. एसजे२१, बजेट कोड- सीई२२अे७०५/एसजे२१-३४, प्रभाग क्र. १५ क मध्ये जुने मंडई जतन व संवर्धन संग्रहालय करणे | १ कोटी | -- |
| नविन सुचविलेले काम | | |
| पुणे शहरामध्ये हेल्थ प्लॅन अंतर्गत रेफेरेन्स सेंटरमधील उपकरणे खरेदी व इतर खर्च बजेट कोड - आरई१७एफ१४७व्ही | -- | १ कोटी |

(टिप : सदर विषयाचा विचार 1 महिन्यानी करावा असे दि. 10/11/२020 च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ८०९**

मा.सौ.वृषाली चौधरी व मा.सुनिल मेंगडे यांचे दि. २७/१०/२०२० चे पत्र.

शिवणे उत्तम नगर हा भाग पुणे महानगरपालिकेमध्ये सन २०१७ मध्ये समाविष्ट करण्यात आलेला आहे. त्या भागामध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाव्दारे शिवणे, कोंढवे-धावडे प्रादेशिक योजनेव्दारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. ही गावे पुणे महानगरपालिका हद्दीत आल्यानंतर या गावांना पुणे महानगरपालिकेच्या वतीने पाणीपुरवठा होणे क्रमप्राप्त आहे. परंतु महानगरपालिका हद्दीत गावे समाविष्ट होवून ३ वर्ष झालेली असून देखील पुणे महानगरपालिकेच्यावतीने कोणत्याही प्रकारचा पाणीपुरवठा या गावांना होत नाही. पुणे महानगरपालिका व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या अधिका-यांची मध्यवर्ती कार्यालय मुंबई येथे सप्टेंबर २०२० महिन्यात बैठक घेण्यात आलेली होती . त्यात महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कडून सदरील पाणीपुरवठा योजना पुणे महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्याबाबत प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे व हस्तांतरीत करण्याबाबत चर्चा देखील झालेली आहे. या चर्चेनुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून पुणे महानगरपालिकेस सदरील पाणीपुरवठा योजना वर्ग होणेसाठी र.रू. सुमारे ३८ कोटीची मागणी करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या वतीने देण्यात येणा-या एकूण पाणी पुरवठा पैकी ८०% पाणी हे शिवणे उत्तमनगर भागातील नागरिकांना केले जाते. परंतु तेथील लोकसंख्येचा विचार करता हा पाणीपुरवठा अतिशय तुटपुंजा असून कमी पाणी मिळाल्याने नागरिकांचे हाल होत आहे. त्याचबरोबर या पाणीपुरवठा योजनेमार्फत २०% पाणीपुरवठा हा कोंढवा धावडे व कोपरे या गावांना होत आहे. कोंढवा धावडे व कोपरे ही गावे नियोजीत पुणे मनपा हद्दीत समाविष्ट करण्यासाठी २३ गावांच्या अंतीम यादीत आहेत. तसेच कोंढवा धावडे ही गावे पुणे मनपा हद्दीच्या लगत असून या गावांचा भविष्यातील पाणी पुरवठयाचा विचार करता या गावांना देखील पुणे

महानगरपालिके मार्फत पाणी पुरवठा करण्यात यावा.जेणेकरून त्या भागांसाठी पुन्हा पाणीपुरवठा राबविण्याची गरज पडणार नाही.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. १०/११/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ८१०**
मा.अजय खेडेकर व मा.धनराज घोगरे यांचे दि. १७/८/२०२० चे पत्र.
प्रभाग क्र.२५ ब वानवडी येथील कै.नामदेव शिवरकर दवाखानामधील डायलेसिस सेंटरची उर्वरित कामे पूर्ण करणेसाठी र.रु.२५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक, शहरातील विविध उद्यानांमध्ये विकास कामे करणे, पान क्र. २९१, यादी क्र.एसयु१, अ.क्र. २२५, बजेट कोड - सीई२६अे३३६/एसयु१-२२४, प्रभाग क्र. १२ क मधील थोरात उद्यान येथील म्युझिकल फाउंटनचे काम करणे | २५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक, भवन विभागाकडील शाळा, दवाखाने, मार्केट, मनपा इमारती, कोठ्या, समाजमंदिरे, घाट, स्मशानभूमी, विसर्जन हौद इ.बाबत देखभाल दुरुस्तीची कामे करणे, पान क्र. १५३, (यादी क्र. एसआर १४), पान क्र. ११८, बजेट कोड- आरई२२अे११३/एसआर१४-१६८, प्रभाग क्र.२५ ब वानवडी येथील कै.नामदेव शिवरकर दवाखानामधील डायलेसिस सेंटरची उर्वरित कामे पूर्ण करणे | --- | २५ लाख |

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. १०/११/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ८११**
अग्निशमन सेवा पुरविणेच्या दरामध्ये मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे दरवाढ करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/अग्निशमन/७१ दि.२०/५/२०२० चे पत्र.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. १०/११/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ८१२**
पुणे महानगरपालिकेच्या चाळ विभागाकडील मनपा वसाहतीमध्ये राहणाऱ्या (रस्ता रुंदीकरण, पुरग्रस्त, गवनि पुर्नवसन व प्रकल्पबाधित) बिगर मनपा सदनिकाधारकांचे निवासी घरभाडे/लायसेन्स फी मध्ये भाडेवाढ करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/सीएसओ/१३९३ दि.१८/२/२०१९ चे पत्र.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. १०/११/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ८१३**
प्रभाग क्र. ३८ अ मधील बिबवेवाडी स.नं. ६५९ पार्ट येथील प्रसुतिगृह व प्राथमिक आरोग्य केंद्राचे इमारतीचे अर्धवट काम पुर्ण करुन कोव्हीड-१९ चे उपचाराकरिता तात्पुरत्या स्वरुपात ऑक्सीजन हॉस्पीटलची व्यवस्था करणेसाठी र.रु.३६५ लक्ष खालीलप्रमाणे वर्गीकरणाने उपलब्ध करुन देणेसाठी मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भवन/३०२ दि.२४/९/२०२० चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२०-२०२१ चे अंदाजपत्रक, मुख्य अभियंता (पथ) कार्यालय, CE20A1249/A6-211, पुणे शहरातील HCMTR रस्ते विकसीत करणे | ३६५ लक्ष | ---- |
| नविन सुचवलेले काम<br>अधिक्षक अभियंता (भवन) कार्यालय, प्रभाग क्र. ३८ अ मध्ये राजीव गांधी नगर येथे प्राथमिक आरोग्य केंद्र व प्रसुतिगृह उभारणे, CE17A242/SJ6-375 | ---- | ३६५ लक्ष |

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. १०/११/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ८१४**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 67 ( 3 ) क मधील तरतुदीच्या अनुषंगाने कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाय योजने अंतर्गत उद्भवलेल्या परिस्थितीवेळी आपत्कालीन परिस्थितीमध्ये लागण झालेल्या रुग्णांच्या व संशयित रुग्णांच्या क्वारंटाईन कक्षाकरीता तातडीने खरेदी करण्यात आलेल्या आवश्यक साहित्याची बिले अदा करणेस मा.महापालिका आयुक्त यांची मान्यता घेण्यात आली असून सदरची बाब मा.स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभा यांचे निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भांडार/४०८ दि.२/११/२०२० चे पत्र.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. १०/११/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ८१५**

सन २०१९–२० चे आर्थिक हिशोबाच्या जमाखर्चास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/४१४ दि. ३/११/२०२० चे पत्र.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. १०/११/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ८१६**

वानवडी-रामटेकडी क्षेत्रिय कार्यालयाचे अंतर्गत क्रांतीवीर संत गाडगे महाराज प्राथमिक विद्यालय, कोंढवा खुर्द येथे स्थापित केलेल्या विलगीकरण कक्षासाठी दि.२५/०६/२०२० पासून स्थापत्य विषयक कामे करणे हे काम अति तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७ (३) (क) अन्वये करणेत आलेल्या खालील बाबी मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.४/४१७ दि.३/११/२०२० चे पत्र.

१) वानवडी-रामटेकडी क्षेत्रीय कार्यालयाचे अंतर्गत संत गाडगे महाराज प्राथमिक विद्यालय, कोंढवा खुर्द येथे स्थापित केलेल्या विलगीकरण केंद्र साठी दि. २९/०६/२०२० ते ३१/०८/२०२०पर्यंतच्या स्थापत्य विषयक कामे करणे या केलेल्या कामांना पश्चात मान्यता मिळणेस, त्यासाठी ठेकेदार मे. निलेश तरवडे कन्स्ट्रक्शन व मे. संतोष पांडुरंग पिसे यांचेशी करारनामा करणेस व प्रत्यक्ष झालेल्या कामांच्या मोजमापानुसार संबंधिताना बिल अदा करणेस. (पू. ग. प. र.रु. १२७३१०४=४८)

२) या होणाऱ्या कामाचे दि. २९/०६/२०२०पासूनचे बिल खालील अर्थशिर्षकामधून अदा करणेस.

महसुली कामांसाठी – RE17F257

Covid-19 अंतर्गत आवश्यक महसुली कामांसाठी (खर्च)

३) वरील अ.क्र. १ व २ ची अंमलबजावणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क) नुसार दि. २९/०६/२०२० ते ३१/०८/२०२०पर्यंत काम करणेस.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. १०/११/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ८१७**

मा.सौ.दिपाली धुमाळ, विरोधी पक्षनेता यांचे दि.१९/११/२०२० चे पत्र.

पुणे महापालिकेने मिळकत करावरील दंडातील रकमेत ८० टक्के सूट देणेची अभय योजना राबविली असून त्याची मुदत ३१ नोव्हेबर २०२० आहे. या योजनेस चांगला प्रतिसाद मिळत आहे. यावर्षी कोरोनाचा वाढता संसर्ग, लॉकडाऊनची पार्श्वभूमी पाहता अनेक व्यवसाय ठप्प झाले आहेत. तसेच नोकरी गमावण्याचे प्रमाण देखील वाढलेले आहे. अनेक नागरिकांना त्यांचे उत्पन्न ठप्प झाल्याने अभय योजनेचा लाभ घेता आला नाही.

सबब पुणे महापालिकेच्या मिळकत कराची अभय योजनेचा कालावधी एक महिना वाढवून ३१ डिसेंबर २०२० पर्यंत करण्यात यावा.
(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ८/१२/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ८१८**

पुणे शहरामध्ये विविध उत्सव, पालखी सोहळा व कार्यक्रमांसाठी भाडेतत्वावर आवश्यकतेनुसार पोर्टेबल टॉयलेट पुरविणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.आदित्य एंटरप्रायजेस यांचे एकच टेंडर आले (पुर्वगणनपत्रक र.रु.४९,९९,०५०/- पेक्षा १६% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४१,९९,२०२/- जीएसटीसह पर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेसोबत करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/घनकचरा/४२१ दि.५/११/२०२० चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार आचारसंहितेनंतर करावा असे दि. १०/११/२०२० च्या सभेत ठरले होते.)

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ८/१२/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**संकीर्ण**

**विषय क्र. ८१९**

पुणे महानगरपालिका झोन क्र.३ अंतर्गत धनकवडी सहकारनगर कार्यालयांचे अंतर्गत (१) श्रीशिवाजी मराठा संस्थेचे मुलांचे वसतीगृह तळजाई पायथा, पुणे (२) श्रीमती लक्ष्मीबाई हजारे मुलींचे वसतीगृह आंबेगाव बु. पुणे (३) पुणे विद्यार्थी गृहाचे मुक्तांगण इंग्लिश स्कुल, अरणेश्वर, पुणे (४) गेणुजी बेलदरे मनपा शाळा, जांभुळवाडी रोड, पुणे (५) अभिनव इंग्लिश स्कुल, स.नं. १३, कात्रज, बायपास रोड, आंबेगाव बुद्रुक, पुणे ४६ येथे स्थापित करण्यात आलेल्या आयसोलेशन/क्वारंटाईन/अवॅटेड केंद्र येथे दररोज दाखल होणाऱ्या नागरिकांना दैनंदिन दुपारचा चहा, लहान मुलांसाठी दुध व बिस्कीट गरजेनुसार बिस्लरी पाणी बॉटल पुरविणे इत्यादी कामे ठेकेदार मे.कृष्णा कंस्ट्रक्शन (प्रोप्रा.कृष्णा माळी) यांचेकडून दि. ९/४/२०२० पासून आणि अवॅटेड सेंटर उभारणेकरिता इमारती/रुममधील सामान हलविणे, स्थापत्य विषयक कामे करणे व काही वस्तु (सन २०१९-२० च्या शेड्युल मान्य दराने आणि काही वस्तु सरळ बाजारातुन रास्त दराने) खरेदी करुन पुरविणे व अवॅटेड सेंटर येथील साफसफाई ठेकेदार मे.शारदा सर्व्हिसेस यांचेकडून दि. १५/६/२०२० पर्यंत काम करुन घेतल्याने ही कामे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क) अन्वये करणेस मा. महापालिका आयुक्त यांची मान्यता मिळाली असून सदर बाब मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभा यांचे निदर्शनास आणुन देणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/प.क्र.३/४७८ दि.९/१२/२०२० चे पत्र.

**शिवाजी दौंडकर**
**प्रभारी नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**

**सुचना - कोरोना विषाणूमुळे उद्भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती. व्हिडीओ कॉन्फरन्सींगची लिंक आपणास व्हॉट्सअॅप द्वारे कळविण्यात येईल.**